ePaper

## महाराष्ट्राला पुन्हा पावसानं झोडपलं, अनेक जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस



| वर्ष - 9 । अंक -63 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

www.mahaenews.com । सोमवार , दि. 27 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- ऑस्ट्रेलियात खेळणं कधीच सोपं नसतं
- पुन्हा खेळायला येऊ की नाही माहित नाही
- मी दहशतवाद्यांचा सामना करू शकतो
- कुर्नूल दुर्घटनेचे खरे कारण आले समोर!

## निवडणूक आयोगाची आज पत्रकार परिषद | आज देशभरातीतील मतदारयादीसंदर्भातील घोषणा

# निवडणूक यंत्रणा ॲक्टिव्ह मोडमध्ये!

## देशव्यापी एसआयआर; पहिल्या टप्प्याची घोषणा शक्य महाराष्ट्रावरही सर्वांचे लक्ष!

- निवडणूक आयोग आज दुपारी 4.15 वाजता घेणार पत्रकार परिषद
- देशातील मतदारयादींची मोठ्या प्रमाणावर पुनर्पडताळणी होणार
- पहिल्या टप्प्यात पश्चिम बंगाल, केरळ, आसाम, तमिळनाडू, पुद्दुचेरी राज्यांना प्राधान्य
- नव्या मतदारांची नोंदणी, मृत व दुबार नावे हटविणे या प्रक्रियेत होणार
- महाराष्ट्रात दुसऱ्या टप्प्यात SIR होण्याची शक्यता
- विरोधकांचा आरोप – मतदारयादीत घोळ, मतचोरी प्रकरणात आयोगावर टीका
- १ नोव्हेंबरला मुंबईत विरोधकांचा मोर्चा; राज ठाकरे यांचा थेट इशारा
- आयोगाकडून आज स्पष्टता; राज्यातील निवडणुकांवर परिणाम होण्याची शक्यता

। नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज

**भारतीय निवडणूक आयोग आज (सोमवार) देशभरातील मतदारयाद्यांच्या पुनर्पडताळणीसंदर्भात ऐतिहासिक निर्णय जाहीर करणार आहे. ही घोषणा मतदारयादी शुध्द आणि अद्ययावत करण्याच्या दृष्टीने आतापर्यंतची सर्वात मोठी प्रक्रिया ठरणार आहे. संपूर्ण देशातील मतदार याद्यांवर पुनर्पडताळणी करण्यात येणार असून, या प्रक्रियेमुळे नव्या मतदारांची नोंदणी, मृत मतदारांचे नाव हटविणे, दुबार नोंदी रद्द करणे, तसेच तांत्रिक चुका दुरुस्त करणे शक्य होईल.**

आयोगाकडून आज दुपारी 4.15 वाजता पत्रकार परिषद घेण्यात येणार आहे. या परिषदेत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह सिंधूआणि विवेक जोशी उपस्थित राहतील. यावेळी SIR प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्याचे वेळापत्रक आणि राज्यनिहाय नियोजन स्पष्ट केले जाण्याची शक्यता आहे.

### देशव्यापी पार्श्वभूमी आणि




### राजकीय संदर्भ

SIR म्हणजे मतदारयादीतील अपूर्णांक, गैरप्रकार आणि तांत्रिक त्रुटी दूर करण्याची व्यापक मोहीम. गेल्या काही वर्षांत मतदारयादीत मृत मतदारांचे नावे, दुबार नोंदी, तसेच स्थलांतरित मतदारांची चुकीची नोंद अशी अनेक समस्या समोर आल्या. आयोगाने बिहार राज्यात प्रयोग म्हणून ही प्रक्रिया काही महिन्यांपूर्वी राबवली होती. त्यावेळी विरोधकांनी मोठ्या प्रमाणात अनियमिततेचे आरोप करत ही बाब सुप्रीम कोर्टात नेली होती.

तथापि, आयोगाने बिहारमधील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ती 'शुध्द आणि पारदर्शक' असल्याचा दावा केला. याच यशाच्या आधारावर आता संपूर्ण देशात SIR प्रक्रिया टप्प्याटप्प्याने राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

### पहिल्या टप्प्यात कोणते राज्ये?

पीटीआयच्या वृत्तानुसार, पहिल्या टप्प्यात देशातील 10 ते 15 राज्यांमध्ये SIR प्रक्रिया सुरू होणार आहे. यामध्ये प्रामुख्याने पश्चिम बंगाल, केरळ, आसाम, तमिळनाडू आणि पुद्दुचेरी या राज्यांचा समावेश असेल. या पाच राज्यांपैकी चार ठिकाणी 2026 मध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत, त्यामुळे आयोगासाठी ही राज्ये प्राधान्यक्रमावर आहेत. आसाम आणि पुद्दुचेरी वगळता उर्वरित चार राज्यांमध्ये

### महाराष्ट्रात दुसऱ्या टप्प्यात प्रक्रिया

महाराष्ट्रात मात्र ही प्रक्रिया पहिल्या टप्प्यात होण्याची शक्यता नाही. सध्या राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नियोजित आहेत. निवडणूक आयोगाला या निवडणुका 30 जानेवारी 2026 पर्यंत पूर्ण करायच्या आहेत. त्यामुळे सध्या राज्य प्रशासन आणि निवडणूक यंत्रणा या निवडणुकांमध्ये गुंतलेली आहे.यामुळे महाराष्ट्र, गुजरात, आणि उत्तर प्रदेशसह काही अन्य मोठी राज्ये दुसऱ्या टप्प्यात SIR प्रक्रियेत सामील होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आयोगाकडून याबाबतची अधिकृत माहिती आजच सायंकाळी जाहीर केली जाईल.

इंडिया आघाडीचे सरकार आहे. त्यामुळे या राज्यांतील SIR प्रक्रियेला राजकीय स्वरूप प्राप्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बिहारमधील अनुभव पाहता, या राज्यांमधील पुनर्पडताळणीवर देशभरातील राजकीय वर्तुळांचे लक्ष केंद्रित होणार आहे.

### SIR म्हणजे काय?

Special Intensive Revision म्हणजेच SIR ही अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे मतदारयादीतील प्रत्येक नोंद पुन्हा तपासली जाते. यात चार प्रमुख मुद्दे असतात: नव्या मतदारांची नोंदणी: 18 वर्षे पूर्ण केलेल्या पात्र नागरिकांना नोंदविणे. मृत मतदारांचे नाव हटविणे: नगरपालिका, ग्रामपंचायत आणि जिल्हा कार्यालयांकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार मृत मतदारांची नावे वगळली जातात.दुबार नोंदी काढणे: एका मतदाराचे नाव दोन वेगवेगळ्या यादीत किंवा भागात असल्यास ते रद्द करणे. त्रुटी दुरुस्ती: पत्ता, वय, लिंग, फोटो किंवा अन्य तांत्रिक माहितीतील चुका सुधारणे. या प्रक्रियेचा उद्देश म्हणजे 'एकच नागरिक, एकच मतदारनाव' हा तत्त्व काटेकोरपणे लागू करणे.

### महाराष्ट्रातील मतदारयादी वाद आणि राजकीय वातावरण तापले

दरम्यान, महाराष्ट्रात सध्या मतदारयादीवरून राजकीय वातावरण तापले आहे. विरोधी पक्षांनी **'मतचोरी'**च्या मुद्द्यावर निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले आहेत. मुंबईतील मतदारयादीत मोठ्या प्रमाणात गोंधळ असल्याचा दावा करत विरोधकांकडून १ नोव्हेंबर रोजी मुंबईत मोर्चा काढला जाणार आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी तर आयोगाला थेट आव्हान दिले आहे – "मतदारयाद्या स्वच्छ झाल्याशिवाय निवडणुका घेऊन दाखवा!" असा त्यांचा इशारा आहे. त्याचवेळी काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार गट) आणि शिवसेना (उद्धव गट) या तिन्ही पक्षांनीही निवडणूक आयोगाकडे मतदारयादीत घोळ झाल्याबाबत तक्रारी नोंदवल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील SIR प्रक्रियेबाबत आयोग कोणती भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### राजकीय अर्थ आणि भविष्यातील संकेत

आयोगाने जर पहिल्या टप्प्यातच काही राज्यांत SIR सुरू करून सकारात्मक परिणाम दाखवले, तर दुसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रात प्रक्रिया जलद गतीने सुरू होण्याची शक्यता आहे. राज्यातील आगामी महानगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांपूर्वी मतदारयादी शुध्द करणे हे लोकशाही प्रक्रियेसाठी अत्यावश्यक ठरणार आहे.

फळभाज्यांची आवक कमी

## कांदा, बटाटा, आले, मटारच्या दरात वाढ...

# दिवाळीनंतर फळभाज्यांची आवक कमी

## मटार, तोतापुरी कैरीच्या दरात वाढ

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**घाऊक बाजारात आवक कमी झाल्याने कांदा, बटाटा, आले, मटार, तोतापुरी कैरीच्या दरात गेल्या आठवड्याच्या तुलनेत वाढ झाली. अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. दिवाळीनंतर फळभाज्यांची पुरेशी तोडणी न झाल्याने सध्या बाजारात फळभाज्यांची आवक कमी प्रमाणावर होत आहे.**




गुलटेकडीतील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून ८० ते ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेशातून १४ ते १५ टेम्पो हिरवी मिरची, इंदूर येथून २ टेम्पो गाजर, कर्नाटकातून ४ टेम्पो कोबी, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू येथून ५ टेम्पो शेवगा, तामिळनाडूतून २०० ते २५० प्लास्टिक जाळी (क्रेट्स) तोतापुरी कैरी, कर्नाटकातून ३ ते ४ टेम्पो घेवडा, कर्नाटकातून २ टेम्पो भुईमूग शेंग, मध्य प्रदेशातून ८ ते १० टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाल्याची माहिती श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.पुणे विभागातून ४०० ते ४५० गोणी सातारी आले, भेंडी ५ टेम्पो, गवार ३ टेम्पो, टोमॅटो ८ हजार पेटी, हिरवी मिरची ४ ते ५ टेम्पो, काकडी ७ ते ८ टेम्पो, फ्लॉवर १० टेम्पो, गाजर ५ टेम्पो, कोबी ६ टेम्पो, ढोबळी मिरची ८ ते १० टेम्पो, भुईमूग शेंग ५० ते ६० गोणी, मटार ४०० ते ४५० गोणी, तांबडा भोपळा १० ते १२ टेम्पो, कांदा ६० ट्रक अशी आवक झाली, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून बटाटा ३० टेम्पो अशी आवक झाली.गेल्या काही दिवसांपासून तेजीत असलेल्या पालेभाज्यांच्या दरात घट झाली आहे. कोथिंबिरेसह सर्व प्रकारच्या पालेभाज्यांच्या दरात घट झाली. मार्केट यार्डातील तरकारी विभागात रविवारी कोथिंबीर एक लाख ५० हजार जुडी, तसेच मेथीच्या ५० हजार जुडींची आवक झाली होती.पालेभाज्यांचे दर (शेकडा जुडी) – कोथिंबीर – ५०० ते १२००, मेथी – १५०० ते २०००, शेपू – ५०० ते १०००, कांदापात – ५०० ते १५००, चाकवत – ५०० ते १०००, करडई- ५०० ते १०००, पुदिना – ५०० ते ६००, अंबाडी – ५०० ते ८००, मुळे – १००० ते १५००, राजगिरा – ४०० ते ७००, चुका- ५०० ते १०००, चवळई – ५०० ते १०००, पालक – १००० ते १५००मागणीच्या तुलनेत आवक चांगली झाल्याने कलिंगड, पपई, खरबूजच्या दरात घट झाली. मागणी वाढल्याने डाळिंबाच्या दरात वाढ झाली. चिकू, अननस, मोसंबी, संत्री, पेरू, लिंबांचे दर स्थिर आहेत. रविवारी फळबाजारात मोसंबी ६० ते ७० टन, संत्री २० ते २५ टन, डाळिंब ७० ते ८० टन, पपई २० ते २५ टेम्पो, लिंबे दोन ते अडीच हजार गोणी, कलिंगड १५ ते २० टेम्पो, खरबूज ४ ते ५ टेम्पो, चिकू ५०० खोकी, अननस २ ट्रक, बोरे १०० गोणी, सीताफळ २० ते २२ टन अशी आवक झाली.गुलटेकडीतील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून ८० ते ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेशातून १४ ते १५ टेम्पो हिरवी मिरची, इंदूर येथून २ टेम्पो गाजर, कर्नाटकातून ४ टेम्पो कोबी, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू येथून ५ टेम्पो शेवगा, तामिळनाडूतून २०० ते २५० प्लास्टिक जाळी (क्रेट्स) तोतापुरी कैरी, कर्नाटकातून ३ ते ४ टेम्पो घेवडा, कर्नाटकातून २ टेम्पो भुईमूग शेंग, मध्य प्रदेशातून ८ ते १० टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाल्याची माहिती श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली५ टेम्पो, काकडी ७ ते ८ टेम्पो, फ्लॉवर १० टेम्पो, गाजर ५ टेम्पो, कोबी ६ टेम्पो, ढोबळी मिरची ८ ते १० टेम्पो, भुईमूग शेंग ५० ते ६० गोणी, मटार ४०० ते ४५० गोणी, तांबडा भोपळा १० ते १२ टेम्पो, कांदा ६० ट्रक अशी आवक झाली, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून बटाटा ३० टेम्पो अशी आवक झाली.

## खरबूजच्या दरात घट झाली

गेल्या काही दिवसांपासून तेजीत असलेल्या पालेभाज्यांच्या दरात घट झाली आहे. मार्केट यार्डातील तरकारी विभागात रविवारी कोथिंबीर एक लाख ५० हजार जुडी, तसेच मेथीच्या ५० हजार जुडींची आवक झाली होती.पालेभाज्यांचे दर (शेकडा जुडी) – कोथिंबीर – ५०० ते १२००, मेथी – १५०० ते २०००, शेपू – ५०० ते १०००१००० ते १५००मागणीच्या तुलनेत आवक चांगली झाल्याने कलिंगड, पपई, खरबूजच्या दरात घट झाली.

# लूटमार करणारा तोतया पोलीस गजाआड

## एटीएममधून पैसे काढणाऱ्या कामगारांना धमकावून लूटमार

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**एटीएममधून पैसे काढणाऱ्या कामगारांना पिस्तुलाचा धाक दाखवून लूटमार करणाऱ्या चोरट्याला बाणेर पोलिसांनी अटक केली. श्रीराम विकास हानवते (वय ३३, रा. एलिगंट रेसीडन्सी, यमुनानगर, निगडी) असे अटक करण्यात आलेल्या तोतया पोलिसाचे नाव आहे. याबाबत किसनकुमार पोरराराम ध्रुव (वय २७, रा. पाषाण) याने बाणेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. तो मूळचा छत्तीसगडचा आहे.**




बाणेर येथील पारपत्र कार्यालयाजवळ १९ ऑक्टोबर रोजी ध्रुव याला हानवते याने पोलीस असल्याची बतावणी करून लुटले होते. ध्रुव आणि त्याच्या मित्राने दिवाळीनिमित्त एका बँकेच्या एटीएममधून आठ हजार रुपये काढले होते. पारपत्र कार्यालयासमोर हानवते दुचाकीवरून आला. त्याने खाकी रंगाचे जॅकेट घातले होते. पोलिसांसारखे बूटही त्याने घातले होते. हानवते यांनी ध्रुव आणि त्याच्या मित्राला अडवले. पोलीस असल्याची बतावणी केली. तुम्ही चोरी केली आहे, असे सांगितले. तुमची झडती घ्यायची आहे, असे सांगून हानवतेने आधारकार्ड दाखविण्यास सांगितले. पसार होण्याचा प्रयत्न केला तर गोळी मारेल, अशी धमकी दिली. दोघांना पोलीस ठाण्यात येण्यास सांगितले. दोघांकडील १३ हजारांची रोकड लांबवून तो पसार झाला. घाबरलेला ध्रुव आणि त्याचा मित्र बाणेर पोलीस ठाण्यात गेले. त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली.एका दुकानाच्या परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण पोलिसांनी तपासले. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्याचा माग काढला.

## लूटमारीचा गुन्हा दाखल

अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, उपायुक्त सोमय मुंढे, सहायक आयुक्त विठ्ठल दबडे यांच्या मार्गदर्शनाखाली बाणेर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत, सहायक निरीक्षक के. बी. डाबेराव, उपनिरीक्षक संदेश माने, पोलीस कर्मचारी बाबा आहेर, किसन शिंगे, अप्पा गायकवाड, संदेश निकाळजे, अतुल इंगळे, गजानन अवतिरक, प्रदीप खरात, प्रीतम निकाळजे यांनी ही कामगिरी केली.आरोपी हानवते हा सराइत आहे.तोडफोड करून रोकड चोरीचा प्रयत्न, तसेच निगडी पोलीस ठाण्यात लूटमारीचा गुन्हा दाखल आहे.

पीएमपी प्रशासनाचे मिशन झिरो ब्रेकडाऊन

पीएमपीचे ब्रेक डाऊन थांबविण्यासाठी

# आता पगारकपातीचा निर्णय!

## रस्त्यात बस बंद पडल्यास चालक व डेपो मेंटेनन्स इंजिनिअर यांचे अर्ध्या दिवसाचे वेतन कपात करणार

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) सतत बंद पडणाऱ्या बसेसमुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यावर उपाययोजना म्हणून पीएमपीच्या स्वमालकीच्या बसेस मार्गावर बंद पडल्यास संबंधित चालक व डेपो मेंटेनन्स इंजिनिअर यांचे अर्ध्या दिवसाचे वेतन कपात करण्यात येणार आहे. यामुळे पीएमपी बसचे ब्रेकडाऊन कमी होणार असून, प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागणार नाही.**




पिंपरी चिंचवड आणि पुणे शहरातील सर्वात महत्त्वाची सार्वजनिक सेवा म्हणून पीएमपीएल बस सेवा मानली जाते. पीएमपी बससेवेची नाळ पुणे आणि पिंपरी या दोन्ही शहराला जोडणारी आहे. मागील जुलै ते सप्टेंबर या तीन महिन्यांत पीएमपीच्या सहा हजार ४०० बस ब्रेकडाऊन झालेल्या आहेत. सतत होणाऱ्या ब्रेकडाऊनमुळे पीएमपी प्रवाशांची डोकेदुखी ठरत होती. यासाठी पीएमपी प्रशासनाने बससेवेचे गुणवत्ता वाढविण्यासाठी कठोर पावली उचलली आहे. यावर उपाय म्हणून स्वमालकीच्या बसेस मार्गांवर बंद पडल्यास संबंधित चालक व डेपो मेंटेनन्स इंजिनिअर यांचे अर्ध्या दिवसाचे वेतन कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे पीएमपी बसचे ब्रेकडाऊन कमी होणार असून, प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागणार नाही. मात्र,

### बस बंद पडल्यामुळे ट्रॅफिकची समस्या

### पीएमपी व भाडेतत्त्वावरील ब्रेकडाऊन बस

महिना/ पीएमपी बस/भाडेतत्त्वावरील बस/एकूण
जुलै/820/1893/2313
ऑगस्ट/ 669/480/2149
सप्टेंबर/503/1435/1938

पिंपरी चिंचवड आणि पुणे शहराच्या हद्दीत पीएमपी बससेवा पुरविली जाते. त्या व्यतिरिक्त पीएमआरडीएच्या भागात सेवा दिली जाते. पीएमपीसेवेचा लाभ घेणाऱ्यामध्ये कार्यालयीन कर्मचारी, शालेय विद्यार्थी, महिला, यांची संख्या लक्षणीय आहे. मात्र, पीएमपीच्या बसेस एनवेळी बंद पडत असल्यामुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. मागील तीन म्हणजेच जुलै ते सप्टेंबर दरम्यान पीएमपीच्या १ हजार पाचशे ९२ बस आणि स्वमालकिच्या ४ हजार आठशे ८ बस तर एकुण सहा हजारे ४०० बस ब्रेकडाऊन झाल्या आहेत. हा प्रकार दररोजच घडत असल्यामुळे प्रवासी त्रस्त झाले होते. त्यातच कामाच्या वेळी होणारा वाहतूककोंडीचा त्रास, त्यासह रस्त्यात बसबंद पडल्यानतंर बस बदलण्यासाठी करावी लागणारी कसरतकसरत लक्षात घेता. पीएमपी प्रशासनाने झिरो ब्रेकडाऊन लक्षकेंद्रीत केले आहे. त्यासाठ प्रशासनाने कठोर पावली उचलली आहे. प्रशासकडून स्वमालकीच्या बसेस मार्गांवर बंद पडल्यास संबंधित चालक व डेपो मेंटेनन्स इंजिनिअर यांचे आर्ध्या दिवसाचे वेतन कपात करण्यात येणार आहे.

# धंगेकर काम करणारे, अन्याया विरोधात लढणारे कार्यकर्ते

## एकनाथ शिंदे : महायुतीच्या विरोधात आयते कोलीत द्यायचे नाही; पदाधिकाऱ्यांना सूचना

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महायुतीमध्ये आपल्याला दंगा करायचा नाही. आपली महायुती आहे आणि महायुतीच्या विरोधात आपल्याला विरोधकांना कोलित द्यायचे नाही. माजी आमदार रविंद्र धंगेकर हे काम करणारे कार्यकर्ते आहेत. अन्याय विरोधात लढणारे आहेत. त्यांनी यापूर्वी स्पष्ट केले आहे की भाजपच्या विरोधात माझी भूमिका नाही. आता तो विषय संपलेला आहे.**



त्यांना ज्या काही गोष्टींची माहिती मिळाली त्याबाबत ते बोलले मात्र आता मी त्यांना सांगितले आहे.आता जे काही प्रकरण सुरू होते. त्यावर देखील पडदा पडेल आणि हा विषय संपेल.’असे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे आळंदी येथे म्हणाले.

आळंदीतील भक्त निवास आणि महाद्वार ते पुंडलिक मंदिर घाट सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या रविवारी हस्ते झाले. त्यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. मंत्री भरत गोगावले, शिवसेनेचे (शिंदे) पुणे महानगरप्रमुख, माजी आमदार रवींद्र धंगेकर यावेळी उपस्थित होते.

पुण्याचे भाजपचे खासदार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर जैन बोर्डिंगच्या जागेवरून धंगेकर यांच्याकडून विविध आरोप केले जात आहेत. महायुतीत एकत्र असलेल्या मोहोळ आणि धंगेकर दोघांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. याबाबत विचारले असता उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, शिवसेनेचे (शिंदे) पुणे महानगरप्रमुख, माजी आमदार रवींद्र धंगेकर काम करणारा कार्यकर्ता आहे.

पुढे एकनाथ शिंदे म्हणाले “महायुतीमध्ये दंगा करायचा नाही. विरोधकांच्या हातात कोलीत मिळेल असे काही करू नका,” असा सल्ला शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना दिला आहे. दरम्यान पुण्यातील माजी आमदार रविंद्र धंगेकर काम करणारा कार्यकर्ता असल्याचे सांगत त्यांनी धंगेकरांची पाठ सुद्धा थोपटली. यावेळी दिल्ली वारीच्या चर्चेवर शिंदे यांनी मौन पाळले.



## भूमिका

# परराष्ट्र संबंध प्रस्थापित करताना

**नुकत्याच झालेल्या तालिबानी प्रतिनिधींच्या भेटीवेळी भारतात परराष्ट्र खात्याच्या मंत्री एखाद्या महिलाच असत्या तर? महिला पत्रकारांशी संवाद नाकारला, तसा त्यांच्याशीही नाकारला असता का?**

नवी दिल्लीतील अफगाण दूतावासाच्या उंच ध्वजस्तंभावर अजूनही लाल, हिरवा आणि काळा रंग असलेला रिपब्लिकचा झेंडा फडकत असताना, तालिबान प्रतिनिधीमंडळाने पत्रकार परिषदेच्या टेबलावर स्वतःचा काळा-पांढरा झेंडा आणलाच.‘द हिंदू’ वृत्तपत्राच्या सुहासिनी हैदर महिला पत्रकार म्हणून तालिबानला परत ‘घ्यायला लागलेल्या’ दुसऱ्या पत्रकार परिषदेत उपस्थित होत्या. त्यांच्या मते “तालिबानी मानसिकतेविरुद्धची लढाई अजून संपलेली नाही. लाखो अफगाण महिलांना शाळा, कॉलेज, नोकरी, अगदी जिम आणि सार्वजनिक उद्यानांमध्ये जाण्याचा अधिकार मिळवण्यासाठीची मोठी आणि जीवन-मरणाची झुंज अजून सुरूही झालेली नाही.




”सीएनएन’ला त्यांनी सांगितले, “ही घटना केवळ एका कार्यक्रमापुरती मर्यादित नव्हती, तर एक प्रकारे उदाहरण ठरू शकली असती. तालिबानचा प्रतिनिधी- ज्याचे सरकार भारताने अजून मान्य केलेले नाही- दिल्लीमध्ये येऊन महिलांशिवाय पत्रकार परिषद घेतो आणि ती भविष्यातील संवादांची परंपरा बनू नये, हे महत्त्वाचे होते.”काबुलशी संवाद साधण्याचा निर्णय भारताने योग्य वेळी, योग्य प्रकारे घेतला आहे – तोही तालिबानच्या देशांतर्गत धोरणांमध्ये न गुंतता. हा धोरणात्मकदृष्ट्या हुशार निर्णय मानला जाऊ शकतो. अफगाणिस्तानशी संवाद साधणे आणि तालिबानी विचारसरणीला मान्यता देणे या दोन्हीत मोठा फरक आहे, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे”, असे ‘द ऑर्गनायझर’च्या माजी संपादक सेशाद्री चारी यांनी म्हटले. पण हा संवाद आपण त्या विचारसरणीला आदर्श मानणाऱ्या पुरुषांशी तर करत आहोत ना? मग त्या ‘दोघांत मोठा फरक’ कसा?तालिबानशी संवाद साधण्यासाठी अनेक व्यवहार्य कारणे असू शकतात असे काही संरक्षण व धोरणात्मक अभ्यास, आंतरराष्ट्रीय सुरक्षा, शस्त्रास्त्र नियंत्रण, संघर्ष प्रक्रिया आणि परराष्ट्र धोरण इत्यादी विषयातील तज्ज्ञांना वाटते कुणालाही भीक न घालता; तर समाजाबाहेरील इतरांशी त्यांचे व्यवहार कितपत सलोख्याचे असू शकतात?नैतिक आदर्शवादी भूमिका बाजूला ठेवून व्यवहाराला अधिक महत्त्व देणे हाच दृष्टिकोन इतरांनी आपल्याशी व्यवहार करताना ठेवला तर? का बरं मग ट्रम्प २.० आपल्याला आवडत नाही? लोकशाहीने ज्याचा पाया दडपशाहीवर आधारित आहे अशा शासनप्रणालीशी कोणत्या स्तरापर्यंत व्यवहार करावा, हा प्रश्न उभा राहतो. ‘द प्रिंट’ च्या स्तंभलेखिका अमाना बेगम अन्सारींनी खूप महत्वाच्या मुद्द्यांच्या आधारे तालिबानच्या या भेटीचे विश्लेषण केले आहे, “उत्तर प्रदेशातील दारुल उलूम देओबंदमध्ये तालिबानी मंत्र्याचे ज्या प्रकारे स्वागत झाले, ते थरकाप उडवणारे होते.महिलांचे शिक्षण, स्वातंत्र्य आणि सन्मानाचा अधिकार नाकारणाऱ्या शासनाचे प्रतिनिधी असलेल्या व्यक्तीला दिलेला तो आदर, टाळ्यांचा गजर आणि उत्सव भयावह होता. एक मुस्लीम स्त्री म्हणून मला हे पाहून भीती वाटते की माझ्या समाजात अशा व्यक्तींना आदराचे स्थान किती सहज मिळते. कटू सत्य असे आहे की अनेक मुस्लीम पुरुष शिकलेले असोत किंवा अशिक्षित, धार्मिक असोत वा नसोत- संधी मिळाल्यास अफगाणिस्तानसारखेच समाज निर्माण करतील, जिथे माझ्यासारख्या आणि माझ्या बहिणींसारख्या स्त्रियांना प्रत्येक संधी आणि आवाजापासून वंचित ठेवले जाईल.

याहून भयंकर म्हणजे, ही विचारसरणी आपल्या समाजातील अनेक पुरुषांमध्ये किती सर्रास दिसू लागली आहे.तालिबान कितीही दूर असला, तरी त्याची विचारधारा इथल्याच काही शिक्षित पुरुषांच्या, समाजमाध्यमी प्रभावकांच्या, आणि अधिकार व न्यायाच्या भाषेत बोलणाऱ्यांच्या मनात जागा मिळवते. ते एखाद्या दिवशी इस्लामोफोबियाचा निषेध करतात आणि दुसऱ्या दिवशी महिलांच्या गुलामीचे गौरवगान करतात- यातला विरोधाभास त्यांना दिसत नाही. तालिबानच्या प्रतिनिधीचे स्वागत करण्यासाठी जमलेले भारतीय मुस्लिमांपैकी अनेक हे दृश्य चिंताजनक होते.”

## प्रासंगिक »

### सणसंहार


***याची जाणीव आहे की हे अरण्यरुदन ठरेल. याचीही जाणीव आहे की कोणा तरी असमंजस उन्मादाने भारलेल्या समाजास या सगळ्याची गरज वाटणारही नाही.***

अल्पमती असलो तरी आम्हा सर्वांस बहुमताचा आधार आहे, अशा वेळी तुम्हा ‘विचारी’ अल्पसंख्यांस विचारतो कोण असे विचारले जाईल, ही शक्यताही नाकारता येत नाही. तरीही हे मुद्दे मांडले गेले पाहिजेत. जे काही सुरू आहे त्यातील हिणकसांबद्दल प्रश्न विचारले गेले पाहिजेत आणि रोष ओढवला जाण्याचा धोका पत्करूनही जे वाईट आहे त्याकडे लक्ष वेधले पाहिजे. कारण चांगले आणि वाईट यांची फारकत बहुसंख्य आणि अल्पसंख्य यामुळे होत नाही. वचनाचा आधार घेऊन संस्कृतीचे प्रतीक गणल्या जाणाऱ्या सणांत सध्या जे काही सुरू आहे ते करणाऱ्यांच्या वृत्तीवर कोरडे ओढायला हवेत.विश्वरूप सामावून घेणाऱ्या भगवान कृष्णाच्या बाललीलांचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या गोपाळकाल्याच्या उत्सवात अनेकांची हाडे मोडतात आणि काही जण दहीहंडीसाठी रचलेल्या मनोऱ्यावरून पडून मरतात.

असरानी गेले, यानिमित्ताने हिंदी चित्रपटांतील सहायक भूमिकांचा इतिहास जरा आठवून पाहा... राज कपूरच्या चित्रपटांत प्रेमनाथ असणारच, गुरुदत्तला रेहमानची साथ हवीच आणि जॉनी वॉकर तर अनेक दिग्दर्शकांना हवा; जॉनी वॉकर यांच्या तोंडी गाणेसुद्धा हवे, असाही एक जमाना होता.

# उत्साह आणि ऊर्मींचा ‘खळाळता’ झरा...!

काळात टुनटुन, जगदीप, केस्टो मुखर्जी, शक्ती कपूर, कादर खान यांच्यासारख्यांना विनोदी भूमिका मिळत राहिल्याच, पण त्या एका छापाच्या होत्या. काही जणांबाबत तर निरुपा राय आईच, इफ्तिकार किंवा जगदीश राज इन्पेक्टरच, सप्रू धनाढ्य भूमिकेतच, एकेकाळचा देखणा नायक अजित हा अहंमन्यपणामुळे हास्यास्पद ठरणारा खलनायकच... असे एकसाचीकरण होत गेले आणि प्रेक्षकांनीही ते स्वीकारले. या अशा काळातही डेव्हिड, देवेन वर्मा आणि असे काही जण कितीही लहान भूमिकांत असले तरी भूमिकेला न्याय देऊन आपापली छाप कायम ठेवायचे. या अशा थोड्यांपैकी असरानी होते. त्यांना मिळणाऱ्या भूमिका कितीही लहान असल्या, चित्रपटाच्या पोस्टरांवर त्यांचे चेहरे असले किंवा नसले, या कथानकामधला कारक घटक ठरणारे खलनायकाचे स्थानही या भूमिकांना नसले, तरी एखादा चित्रपट आठवताना नायक- नायिकांसह या



सहायक भूमिका करणाऱ्यांचीही आठवण व्हायचीच. ‘तो काळ आता सरला’ असे म्हणण्याची सोयच असरानींनी अगदी आता-आतापर्यंत ठेवली नव्हती. प्रियदर्शनच्या अत्रंग विनोदपटांत असरानी यांनी वयाच्या पंच्याहत्तरीनंतरही सहायक भूमिका केल्या. त्या भूमिकांतही ते स्वत:च्या सर्व वैशिष्ट्यांसह वावरले. त्यापैकी पहिले वैशिष्ट्य म्हणजे कर्कश वाटणारा, टिपेचा पण काहीसा एकसुरी आवाज! त्या आवाजाला नुसत्या स्वरयंत्राचीच नव्हे तर इतिहास-भूगोलाचीही जणू पार्श्वभूमी होती... गुजरातच्या उत्तर भागापासून पुढे सिंध प्रांतापर्यंत आवाजाची ही पातळी सहजपणे गाठू शकणारे लोक अनेक. ती बहुधा त्यांच्या पिढ्यानपिढ्यांच्या जीवनसंघर्षाची खूण. त्याच टापूतल्या जयपूरहून गोवर्धन असरानी हा तिथला ‘रेडिओ आर्टिस्ट’ असलेला, आकाशवाणीवरल्या नभोनाट्यांत सहभागी होणारा तरुण आधी मुंबईत आला आणि टक्केटोणपे खाण्यापेक्षा पुण्याच्या भारतीय चित्रपट आणि चित्रवाणी संस्थेत जा, हा सल्ला ऐकून पुण्याच्या भारतीय चित्रपट व चित्रवाणी संस्थेत (एफटीआय) मध्ये पोहोचला. तिथे डेव्हिड धवन, जया भादुरी, डॅनी डँझोपा आदींसह शिकला आणि अर्थातच, कामाच्या शोधात मुंबईच्या जुहू आदी भागात खेटे घालू लागला. त्याच वर्षी ‘हम कहाँ जा रहे है’सारख्या- फक्त गाण्यांपुरत्याच लक्षात राहणाऱ्या चित्रपटात कुणा विद्यार्थ्याची भूमिकाही मिळवली, पण पुढल्या तीन वर्षांत मात्र दरवर्षी एखाद्या चित्रपटाच्या पुढे गाडे गेले नाही. सन १९७१ मध्ये हृषीकेश मुखर्जींच्या ‘गुड्डी’तल्या शीर्षक-भूमिकेतून जया भादुरी यांना जशी करिअरची वाट मिळाली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

३३ प्रस्तावांना प्रतीक्षा

विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना...

# 198 विद्यार्थ्यांना 2 कोटींची मदत

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्य सरकारच्या राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेच्या माध्यमातून गेल्या वर्षभरात जिल्ह्यातील १९८ कुटुंबीयांना २ कोटी ५ लाख ८२ हजार ७६४ रुपयांची मदत उपलब्ध करण्यात आली आहे. अद्याप ३३ विद्यार्थ्यांचे प्रस्ताव मदतीच्या प्रतीक्षेत आहेत. त्यासाठी ३३ लाख १०६ रुपयांची मागणी शिक्षण विभागाकडून राज्य सरकारकडे करण्यात आली आहे.**

## ३३ लाख १०६ रुपयांची मागणी



शिक्षण विभागाकडून (योजना) मिळालेल्या माहितीनुसार विद्यार्थ्यांचा शाळेत किंवा शाळेबाहेर अपघात झाल्यास, या अपघातात मृत्यू झाल्यास किंवा अपंगत्व आल्यास राज्य सरकारकडून राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह योजनेद्वारे मदत केली जाते. सन २०२५-२५ या कालावधीत १६२ लाभार्थ्यांना १ कोटी ६९ लाख १४ हजार ५०० रुपयांची तर एप्रिल २०२५ नंतर ३६ लाभार्थ्यांना ३६ लाख ६८ हजार २६४ रुपयांची मदत देण्यात आली आहे. दि. २९ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या समितीने ३३ प्रस्ताव मंजूर केले आहेत. त्यांच्या मदतीसाठी राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे.राज्य सरकार ही योजना पूर्वीपासून राबवते. सन २०२२ मध्ये त्यात सुधारणा करून मदतीमध्ये वाढ करण्यात आली. त्यानुसार इयत्ता १ ली ते १२ वीच्या सर्व प्रकारच्या शाळांतील विद्यार्थ्यांसाठी योजना राबवली जाते. त्याद्वारे विद्यार्थ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास १.५ लाख रुपये, दोन अवयव निकामी झाल्यास १ लाख रुपये, एक अवयव निकामी झाल्यास ७५ हजार रुपये तसेच ही मदत किंवा शस्त्रक्रियेसाठीची १ लाख रुपयांपर्यंतची मदत योजनेद्वारे दिली जाते. त्यासाठी मुख्याध्यापक व गट शिक्षणाधिकाऱ्यांकडून ऑनलाइन प्रस्ताव सादर केले जातात. गुन्ह्यातील सहभाग, आत्महत्या, शर्यत आदी विघातक कृत्यात मृत्यू अथवा अपंगत्व आल्यास मदत नाकारली जाते.प्रस्ताव सादर करताना विद्यार्थ्याचे बोनाफाईड, आधार कार्ड, आईच्या बँक पासबुकची सत्यप्रत, शिधापत्रिकेवरील नाव, पोलीस ठाण्याचा प्राथमिक अहवाल (एफआयआर), पंचनामा, इनक्वेस्ट रिपोर्ट, पोस्टमार्टम रिपोर्ट, मृत्यू प्रमाणपत्र आदी कागदपत्रांची आवश्यकता भासते. मदत आईच्या खात्यावर जमा होते. आई-वडील हयात नसतील तर १८ वर्षांवरील भाऊ-बहीण यांच्या खात्यावर मदत वर्ग केली जाते.शालेय विद्यार्थ्यांसाठी ही योजना उपयुक्त आहे. लाभार्थी विद्यार्थ्यांचे प्रस्ताव गट शिक्षणाधिकाऱ्यांमार्फत मुख्याध्यापकांनी तत्काळ सादर केले पाहिजेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा समितीने अवलोकन केले असता, पालकांनी अठरा वर्षांच्या आतील विद्यार्थ्यांना वाहन चालवण्यास देऊ नये, असे कायदा सांगत असला तरी विद्यार्थ्यास वाहन चालवण्यास दिले जाते. नवीन कायद्यानुसार अशा परिस्थितीत पालकांविरुद्ध गुन्हे दाखल होऊ शकतात, याबाबत जनजागृती होणे आवश्यक आहे.सन २०२४-२५ मध्ये दाखल झालेल्या १६२ प्रस्तावांमध्ये १ ली ते १२ वीच्या विद्यार्थ्यांच्या अपघाती मृत्यूची संख्या ४०, बुडून मृत्यू २८, विजेचा धक्का बसून ११, वीज पडून २, सर्पदंशाने ५, आजारी पडून १५, कायमचे अपंगत्व आलेले ५ व क्रीडा स्पर्धेत अपंगत्व आलेल्या एका प्रस्तावाचा समावेश आहे. त्यानंतर मंजूर झालेल्या ३३ प्रस्तावांमध्ये अपघाती ८, सर्पदंश १, बुडून ३, विजेचा धक्का बसून १ व आजारी पडून ४ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला.शाळेबाहेर अपघात झाल्यास, या अपघातात मृत्यू झाल्यास किंवा अपंगत्व आल्यास राज्य सरकारकडून राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह योजनेद्वारे मदत केली जाते.

### मदतीसाठी सरकारकडे प्रस्ताव

सन २०२५-२५ या कालावधीत १६२ लाभार्थ्यांना १ कोटी ६९ लाख १४ हजार ५०० रुपयांची तर एप्रिल २०२५ नंतर ३६ लाभार्थ्यांना ३६ लाख ६८ हजार २६४ रुपयांची मदत देण्यात आली आहे. दि. २९ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या समितीने ३३ प्रस्ताव मंजूर केले आहेत. त्यांच्या मदतीसाठी राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे.राज्य सरकार ही योजना पूर्वीपासून राबवते. सन २०२२ मध्ये त्यात सुधारणा करून मदतीमध्ये वाढ करण्यात आली.

# राजकीय आरोपांना भीक नाही!

## फलटण आत्महत्या प्रकरणाचा निपक्ष तपास होणार – मुख्यमंत्री

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**फलटण येथे आत्महत्या केलेल्या भगिनीला न्याय देणार आणि कोणत्याही राजकीय आरोपांना, दबावाला बळी न पडता निष्पक्ष तपास करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फलटण येथे सांगितले.**

फलटण येथे आयोजित भूमिपूजन, लोकार्पण कार्यक्रमात व शेतकरी मेळाव्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी पालकमंत्री शंभूराजे देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, आमदार सचिन पाटील आदी उपस्थित होते.फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयातील आत्महत्या केलेल्या डॉक्टर भगिनीला कोणत्याही परिस्थितीत न्याय मिळवून देणार आहे. आत्महत्येचे कारण तळहातावर लिहून तिने आत्महत्या केली. तपासामध्ये नवनवीन गोष्टी पुढे येत आहेत. कोणत्याही परिस्थितीत आम्ही या भगिनीला न्याय मिळवून देण्याचे काम करू, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले



.ते म्हणाले, कोणतेही कारण नसताना रणजितसिंह नाईक निंबाळकर आणि आमदार सचिन पाटील यांचे नाव पुढे करून त्यावरून राजकीय भूमिका घेण्याचा प्रयत्न घेऊन आमच्या सहकाऱ्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न सहन करणार नाही. अशा राजकीय भूमिकेला उत्तर देण्याबाबत आम्ही कमी पडणार नाही असे खडेबोलही त्यांनी नाव न घेता रामराजे नाईक निंबाळकर व विरोधकांना सुनावले. याविषयी विरोधक राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांच्या आरोपांना आणि दबावाला बळी न पडता या प्रकरणाचा तपास केला जाईल, असे फडणवीस यांनी सांगितले. नीरा देवघर धरणाच्या कालव्यांचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून दुसऱ्या महत्त्वाच्या टप्प्याचे काम सुरू आहे. दुष्काळमुक्तीसाठी कोणत्याही परिस्थितीत सांगोला माळशिरससह माण खटाव फलटण या दुष्काळी भागात पाणी पोहोचवल्याशिवाय राहणार नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. सगळी कामे पूर्ण करून जे काम आजपर्यंत अशक्य वाटत होते असे दुष्काळ हटविण्याचे काम आम्ही करणार असल्याचेही फडणवीस म्हणाले. काही लोकांना प्रगत पश्चिम महाराष्ट्र नको आहे.

### कालव्यांचा पहिला टप्पा पूर्ण

त्यांना या परिसरात पाणी नको आहे. ते सर्व प्रश्न असेच अधांतरी ठेवून लोकांच्या जीवावर पोळी भाजण्याचा प्रयत्न करत असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले. हा दुष्काळ दूर करण्याचे काम शासनाने हाती घेतले असून सर्व कामे पूर्ण झाल्यावर हरित माणदेश तयार करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## महागठबंधनला मतदान करा

## मुलाच्या मृत्यूनंतर मोहम्मद मुस्तफा झाले व्यक्त

# मी दहशतवाद्यांचा सामना करू शकतो

## व्यसनाधीन मुलाचा सामना नाही

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पंजाबचे माजी पोलीस महासंचालक मोहम्मद मुस्तफा आणि त्यांची पत्नी, माजी मंत्री रझिया सुलताना गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहेत. एकेकाळी पंजाबमध्ये अंमली पदार्थविरोधातील लढाईचे नेतृत्व केल्यामुळे त्यांचे कौतुक झाले होते. मात्र अंमली पदार्थाच्या विरोधातील खरी लढाई ते स्वतःच्या घरातच लढत होते.**



### आम्ही नरकयातना भोगल्या

मागच्या १८ वर्षांत आम्ही नरकयातना भोगल्या. या काळात मी माझे आई, वडील आणि बहीण गमावली. पण मुलगा गमावण्याचे दुःख सर्वात वाईट आणि तीव्र आहे.”मुलगा अकील अख्तर याला व्यसनाधीनतेच्या जाळ्यातून बाहेर काढण्यासाठी १८ वर्षे संघर्ष केला. याबद्दल मुस्तफा यांनी माहिती दिली. शिवाय त्यांच्यासह पत्नी आणि काँग्रेसच्या माजी कॅबिनेट मंत्री रझिया सुलताना यांच्यावर मुलाच्या हत्ये प्रकरणात गुन्हाही दाखल झाला आहे.

काही दिवसांपूर्वी मुलाचा मृत्यू झाल्यानंतर मोहम्मद मुस्तफा वादाच्या भोवऱ्यात अडकले. नुकतेच त्यांनी इंडियन एक्स्प्रेसशी बोलत असताना आपल्या मनातील दुःखाला वाट मोकळी करून दिली. इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना मोहम्मद मुस्तफा म्हणाले, “मी दहशतवाद्यांचा सामना करू शकतो, पण माझ्या व्यसनाधीन मुलाचा सामना करू शकलो नाही. मागच्या १८ वर्षांत आम्ही नरकयातना भोगल्या. या काळात मी माझे आई, वडील आणि बहीण गमावली. पण मुलगा गमावण्याचे दुःख सर्वात वाईट आणि तीव्र आहे.”मुलगा अकील अख्तर याला व्यसनाधीनतेच्या जाळ्यातून बाहेर काढण्यासाठी १८ वर्षे संघर्ष केला. याबद्दल मुस्तफा यांनी माहिती दिली. त्यांनी मुलगा तर गमावलच. शिवाय त्यांच्यासह पत्नी आणि काँग्रेसच्या माजी कॅबिनेट मंत्री रझिया सुलताना यांच्यावर मुलाच्या हत्ये प्रकरणात गुन्हाही दाखल झाला आहे.मी एसटीएफ प्रमुख असताना राज्यभरात आणि माझ्या स्वतःच्या घरात अमली पदार्थाविरोधात लढाई लढली”, असे मुस्तफा म्हणाले. २०१८ साली माजी मुख्यमंत्री अमरिंदर सिंग यांच्या काळात त्यांच्यावर अमलीपदार्थाविरोधात स्थापन करण्यात आलेल्या विशेष कार्य दलाचे प्रमुखपद देण्यात आले होते. “पोलीस अधिकारी म्हणून मी कोणत्याही मोहिमेत अपयशी ठरलो नाही. पण वडील म्हणून मी हरलो”, असे दुःख मुस्तफा यांनी व्यक्त केले.मुलगा अकील अख्तर व्यसनाधीनतेच्या जाळ्यात कसा अडकला? याची माहितीही त्यांनी दिली. ते म्हणाले, २००७ साली देहरादून येथील शाळेत नववीत शिकत असताना मला एका मित्राने सांगितले की, अकील शाळेची भिंत ओलांडून बाहेर जात आहे आणि मित्रांबरोबर हुक्का पित आहे. यानंतर त्याला शाळेतून काढून टाकले गेले. मी आणि पत्नी रझियाने विनवणी केल्यानंतर त्याला शाळेत घेतले गेले.

पण सहा महिन्यांनी पुन्हा त्याला शाळेतून काढले. या घटनेनंतर चंदीगड, पंचकुला येथील अनेक शाळांमधून त्याला वारंवार काढले गेले.तो हुशार मुलगा होता. एकदा त्याने प्रतिष्ठित विधी महाविद्यालयाची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण केली होती. २०२१ साली त्याने विधी महाविद्यालयात प्रवेश मिळवला. पदवीही घेतली. त्याने नामांकित वकिलांबरोबर प्रॅक्टिस करावी, यासाठी मी अनेकांकडे शब्द टाकला.

पण तो कधीही कुणाबरोबर टिकला नाही”, असेही मोहम्मद मुस्तफा यांनी सांगितले.मुलाला अनेकदा व्यसनमुक्ती केंद्रात टाकले होते. मागच्या वर्षीच त्याला पतियाळा येथील पुनर्वसन केंद्रात दुसऱ्यांदा टाकले होते. तिथे काही आठवड्यात त्याच्यात बदल व्हायचा. मात्र याकाळात आई रझिया नैराश्यात जायची. तिला झोप लागत नसे. मग आम्ही त्याला पुन्हा घरी आणत असू.१६ ऑक्टोबर रोजी अकीलचा मृतदेह त्याच्या खोलीत आढळला. काही लोक हे आमचे षडयंत्र असल्याचे सांगत आहेत. एक वडील म्हणून मला किती दुःख होत आहे, हे मी सांगू शकत नाही. पण आता एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे. तसेच हे प्रकरण सीबीआयच्या ताब्यात देण्यात आले आहे, याचे मी स्वागत करतो. सीबीआयच्या चौकशीतून सत्य बाहेर येईल आणि आमचे निर्दोषत्व सिद्ध होईल, असेही ते म्हणाले.काही दिवसांपूर्वी मुलाचा मृत्यू झाल्यानंतर मोहम्मद मुस्तफा वादाच्या भोवऱ्यात अडकले. नुकतेच त्यांनी इंडियन एक्स्प्रेसशी बोलत असताना आपल्या मनातील दुःखाला वाट मोकळी करून दिली. इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना मोहम्मद मुस्तफा म्हणाले, “मी दहशतवाद्यांचा सामना करू शकतो, पण माझ्या व्यसनाधीन मुलाचा सामना करू शकलो नाही.

# कुर्नूल बस दुर्घटनेचे खरे कारण आले समोर!

## 20 निष्पापांचा बळी घेणाऱ्या जळीतकांडाबद्दल फॉरेन्सिक रिपोर्टमध्ये खुलासा

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आंध्र प्रदेशच्या कुर्नूल येथे झालेल्या भीषण बस अपघातात २० जणांचा जीव गेला आहे. दरम्यान या अपघाताबद्दल आता काही महत्त्वाच्या अपडेट्स समोर येत आहेत. हा अपघात दारू पिऊन गाडी चालवणाऱ्या दुचाकी चालकामुळे झाला असण्याची शक्यता आहे, असा निष्कर्ष फॉरेन्सिक अहवालातून काढण्यात आला आहे.**



### दुचाकीचा अपघात झाला होता

गुरुवारी संध्याकाळी धोने येथे काही काम असल्याचे आपल्या आईला,हा बस अपघात आता आंध्र प्रदेश पोलिसांच्या विशेष तपास पथकाकडून (SIT) चौकशी केल जात आहे. स्वामीच्या जबाबावनुसार, पोलिसांनी यापूर्वी असा निष्कर्ष काढला होता की, बसची धडक बसण्यापूर्वी दुचाकीचा अपघात झाला होता.

द इंडियन एक्स्प्रेसने यासंबंधीचे वृत्त दिले आहे अपघातात मृत्यू झालेला दुचाकी चालक बी. शिव शंकर हा दारूच्या नशेत गाडी चालवत असताना ओल्या रस्त्यावर त्याची दुचाकी घसरून पडली असे सांगितले जात आहे. कुर्नूलचे डिआयजी के. प्रवीण यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सांगितले की, “चालक नशेत होता आणि दुचाकीची हेडलाइट काम करत नव्हती. दारूच्या नशेत बेदरकारपणे गाडी चालवल्यामुळे हा अपघात झाला.” या अपघातात दुचाकीचालक मरण पावला, तर त्याच्याबरोबर असलेल्या येर्री स्वामी याला किरकोळ दुखापत झाली आणि तो बचावला. या अपघातात बसेन कथितरित्या बाईकला धडक दिल्यानंतर बसला आग लागली, ज्यात बसमधील १९ प्रवाशांचाही मृत्यू झाला.बस डिव्हायडर जवळ आधीच पडलेल्या दुचाकीच्या संपर्कात आली.

बस दुचाकीवरून गेली आणि दुचाकीला जवळपास ३०० मिटर दूरपर्यंत फरपटत घेऊन गेली. त्यानंतर स्फोट होऊन आग लागण्याची घटना घडली,” असे प्रवीण यांनी सांगितले.अपघात होण्यापूर्वी त्याने दुचाकी चालक आणि दुचाकी या दोघांनाही रस्त्यावरून बाजूला काढण्याचा प्रयत्न केला होता, अशी माहिती सहप्रवासी असलेल्या स्वामीची चौकशी केली असता पोलिसांना आढळून आली आहे.दुचाकी चालक हा नशेत होता हे दाखवणारे पुरेसे पुरावे होतेच, पण आता आमच्याकडे ठोस पुरावा आहे कारण आम्ही घेतलेल्या व्हिसेरा (VISCERA) नमुन्यात अल्कोहोल असल्याचे आढळले आहे,” असे डीआयजी प्रवीण म्हणाले.

शिव शंकर हा कुर्नूलमधील बी. थंद्रापडू गावातील रहिवासी होता आणि अपघाताचे ठिकाण असलेल्या चिन्नटेकूर परिसरापासून त्याचे हे गाव सुमारे २० किलोमीटर अंतरावर येते. तसेच तो ग्रॅनाईटचा व्यवसाय करायचा.

# लाखात एक आमचा दादा'मध्ये येणार सूर्या दादाची खरी आई!

'झी मराठी' वाहिनीवर प्रसारित होणारी 'लाखात एक आमचा दादा' ही मालिका गेल्या काही दिवसांपासून चांगलीच चर्चेत आहे. या मालिकेत तुळजाची भूमिका साकारणाऱ्या मुख्य अभिनेत्रीने प्रकृतीच्या कारणास्तव या मालिकेतून एक्झिट घेण्याचा निर्णय घेतला. आता 'तुळजा'च्या रुपात मालिकेत मृण्मयी गोंधळेकरची एन्ट्री झालेली आहे. यापूर्वी तिने 'सुख म्हणजे नक्की काय असतं' या मालिकेत राजमाची भूमिका साकारली होती. आता नव्या तुळजाला प्रेक्षक कसा प्रतिसाद देणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. सध्या मालिकेत सूर्या आणि तुळजामध्ये वाद निर्माण झाल्याचा सीक्वेन्स चालू आहे. मालिकेत जालिंदरच्या घरातील पार्टीत गोंधळ झाल्यानंतर, सूर्या त्याच्या बहिणींना घरी घेऊन येतो. दुसऱ्या दिवशी, त्याच्या चारही बहिणी त्याला त्याची चूक लक्षात आणून देतात. आता सूर्या दादा तुळजाची मनधरणी करण्याचा प्रयत्न करत आहे. अशातच, जगताप कुटुंबीयांच्या घरी धनूला



एक स्थळ पाहायला येतं. यावेळी सूर्या मोठ्या काळजीत पडतो कारण, तुळजाशिवाय पाहुणे लग्नाचा प्रस्ताव नाकारू शकतात...याची त्याला पूर्ण खात्री असते. तुळजाला किमान धनूच्या लग्नाची बोलणी होईपर्यंत तरी थांबण्याची विनंती सूर्या करतो. पाहुणे तुळजाच्या अनुपस्थितीबद्दल विचारपूस करतात. जालिंदर सूर्या आणि तुळजामधील संघर्ष उघड करणार तेवढ्यातच तुळजा दारात येते. यावेळी मालिकेत मृण्मयीची एन्ट्री होणार आहे.तर, आता येत्या काळात तुळजाला वैद्यकीय शिबिरासाठी जेलमध्ये बोलावलं जातं. योगायोगाने, हे तेच जेल आहे जिथे सूर्याची खरी आई आहे आणि जालिंदरला कळतं की ती पॅरोलवर सुटणार आहे. जालिंदरला हे ही समजलंय सूर्या आणि तुळजा याच जेलमध्ये शिबिरासाठी जाणार आहेत. आता जालिंदर सूर्या आणि त्याच्या आईची भेट टाळू शकेल? सूर्या आणि त्याच्या आईची तुरुंगात भेट होईल का? याची उत्तर प्रेक्षकांना 'लाखात एक आमचा दादा' मालिकेच्या आगामी भागात मिळणार आहेत.

## सुंदरी' मालिकेत खरातची एन्ट्री

या कार्यक्रमामधून प्रेक्षकांच्या भेटीस येणारी अभिनेत्री वनिता खरात (VANITA KHARAT) ही आता एका नव्या मालिकेमधून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. नुकताच 'सुंदरी' (SUNDARI) या मालिकेचा एक प्रोमो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या प्रोमोमधील वनिताच्या लूकनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. सुंदरी या मालिकेच्या प्रोमोमध्ये दिसत आहे की, सुंदरी ही साहेब प्लाझा तोडण्याचा आदेश देते. तेवढ्यात वनिता खरातची एन्ट्री होते. काळी साडी, काळी टिकली आणि ऑक्लाइडचे दागिने अशा लूकमध्ये वनिता दिसत आहे. वनिताचा हा लूक पाहिल्यानंतर लक्षात येत आहे की, सुंदरी या मालिकेत ती खलनायिकेची भूमिका साकारत आहे. अनेक नेटकऱ्यांनी कमेंट करुन वनिताला तिच्या या मालिकेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. एका नेटकऱ्यानं कमेंट केली,"मला वाटतं वनिता खरातने अशाच नवनवीन भूमिका साकारायला हरकत नाही . या मलिकेत ती खलनायकाची भूमिका खुप सुंदर साकारणार आहे, असं प्रोमो पाहून कळत आहे." तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "फायर है तू" तसेच सुयश टिळक,पृथ्वीक प्रताप, प्रियदर्शिनी इंदलकर यांनी देखील सुंदरी या मालिकेच्या प्रोमोला कमेंट करुन वनिताला तिच्या आगामी मालिकेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. सुंदरी या मालिकेत अभिनेत्री आरती बिराजदार ही प्रमुख भूमिका साकारते. आता सुंदरी या मालिकेत वनिताची एन्ट्री झाल्यानंतर पुढे काय काय घडणार? हे पाहण्यास प्रेक्षक उत्सुक आहेत.

## हार्ट इमोजी, जोडलेले हात



बॉलिवूडसह हॉलिवूडवर राज्य केलं आहे. अभिनेत्रीचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणा ठरतो. प्रियंकाने नुकतीच 'जियो मामी मुंबई फिल्म फेस्टिव्हल'मध्ये हजेरी लावली. त्यावेळी तिने तिचं आयुष्य, करिअर, अनुभव यासर्व गोष्टींबद्दल भाष्य केलं. त्यावेळी "मी वाहणारी नदी आहे, एक दिवस समुद्र होण्याची माझी इच्छा आहे", असं प्रियंका म्हणाली. 'जियो मामी मुंबई फिल्म फेस्टिव्हल'दरम्यान प्रियंका चोप्रा म्हणाली,"मला तलावासारखं व्हायचं नाही. मी वाहणारी नदी आहे. एक दिवस समुद्र होण्याची माझी इच्छा आहे". प्रियंकाचा आज जागतिक पातळीवर दबदबा आहे. मिस वर्ल्ड, नॅशनल अ‍ॅवॉर्ड विजेती बॉलिवूड अभिनेत्री, हॉलिवूड स्टार, गायिका, निर्माती, लेखिका, उद्योगपती सारख्या विविध क्षेत्रांत प्रियंकाने आपल्या कामाचा झेंडा रोवला आहे. प्रियंका चोप्रा म्हणाली,"सिनेसृष्टीत पदार्पण करण्याचा निर्णय माझा नव्हता. या क्षेत्रात मला जबरदस्तीने ढकललं गेलं आहे. त्यानंतर सहकलाकारांकडून अभिनय म्हणजे नक्की काय हे मी शिकले आहे. एखाद्या गोष्टीत मी 100% देत असते. दररोज सर्वोत्कृष्ट काम करण्याचा माझा प्रयत्न असतो. यशाचं फळ मिळतचं. दररोज चांगलं काम केल्यास लवकरच तुम्ही यशस्वी व्हाल.". प्रियंका चोप्रा पुढे म्हणाली,"प्रत्येक प्रोजेक्टमध्ये मी खूप मेहनत घेत असते. संहितेवर काम केल्यानंतरच मी सेटवर जाते. कलाकाराचं काम हे अ‍ॅक्शन आणि कटच्या मध्ये सुरू असतं. पण एखाद्या प्रोजेक्टसाठी 200 लोक मेहनत घेत असतात. तुमचा चेहरा फक्त त्यांचं प्रतिनिधित्व करत असतो. त्यामुळे माझा कोणता सिनेमा चालला नाही तर नक्कीच मला वाईट वाटतं". प्रियंका चोप्राला हॉलिवूडमध्येही बॉलिवूडसारखं काम करायचं आहे. ती म्हणते,"हिंदी मनोरंजनसृष्टीत मी 15 वर्षे काम केलं आहे. तर 6-8 हॉलिवूडपटांमध्ये मी झळकले आहे. पण बॉलिवूडमध्ये जसं विविधतापूर्ण काम करता आलं आहे. तसंच मला हॉलिवूडमध्येही करायचं आहे. स्वत:ला चॅलेंज द्यायला मला आवडेल". 'अंदाज' सिनेमाच्या यशानंतर प्रियंका चोप्राने कधीच मागे वळून पाहिलं नाही. फ्लॅन, किस्मत, असंभव सारख्या सिनेमांत तिने काम केलं. 2005 मध्ये आलेला 'मुझसे शादी करोगी' या सिनेमातील प्रियंकाच्या अभिनयाला प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली.

## 'परि, स्वरा ते कियारा!

करवा चौथ हा एक महत्त्वाचा सण आहे. प्रामुख्याने उत्तर भारतातील विवाहित महिलांद्वारे साजरा केला जातो. करवा चौथ हा सण विवाहित महिलांसाठी अतिशय महत्वाचा असतो. यंदा करवा चौथ हा सण 1 नोव्हेंबरला म्हणजेच उद्या साजरा होणार आहे. सर्वत्र महिला या सणाच्या तयारीला लागल्या आहेत. त्यातच लग्नानंतरचा करवा चौथ हा खुपच खास असतो. आता बी टाऊनमध्येही अशा कही अभिनेत्री आहेत ज्यांनी या वर्षी 2023 मध्ये लग्न केले आहे. या अभिनेत्री आपल्या लग्नानंतरच्या पहिल्या करवा चौथसाठी खूप उत्सुक आहेत. चला तर मग जाणून घेऊया या वर्षी कोणती बॉलिवूड अभिनेत्री आपली पहिली करवा चौथ साजरी करणार आहे. यात पहिल नाव येत ते अभिनेत्री कियारा अडवाणीचे. कियाराने सिद्धार्थ मल्होत्रासोबत फेब्रुवारी 2023 मध्ये लग्न केले आहे. कियारा तिचा पहिला करवा चौथ साजरा करण्यासाठी तयार आहे. 'शेरशाह' चित्रपटाच्या सेटवर दोघांची लव्हस्टोरी सुरु झाली.



## विश्वास नांगरे पाटील यांनी पाहिला 'छावा'

'छावा' चित्रपटाची सध्या बॉक्स ऑफिसवर क्रेझ पाहायला मिळत आहे. लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित या सिनेमात छत्रपती संभाजी महाराजांची शौर्य गाथा दाखवण्यात आली आहे. चित्रपटात विकी छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेत आहे, तर रश्मिका मंदाना महाराणी येसूबाईंच्या भूमिकेत आहे. अभिनेता अक्षय खन्नाने औरंगजेबाची भूमिका साकारली आहे. या चित्रपटाबद्दल सेलिब्रिटी व राजकीय नेते प्रतिक्रिया देत आहेत. अशातच या सिनेमाबद्दल आयपीएस विश्वास नांगरे पाटील यांनी केलेल्या पोस्टने लक्ष वेधून घेतले आहे. विश्वास नांगरे पाटील यांनी विकी कौशलचा छत्रपती संभाजी महाराज यांच्या लूकमधील एक फोटो पोस्ट केला आहे.छत्रपती संभाजी महाराज हे एक गारूड आहे, मराठी माणसाच्या स्वभिमानाचे, स्फुल्लिंगाचे प्रतीक आहेत, असं पाटील यांनी लिहिलं आहे.छत्रपती संभाजी महाराज हे एक गारूड आहे, मराठी माणसाच्या स्वभिमानाचे, स्फुल्लिंगाचे प्रतीक आहे, स्वराज्याच्या स्वप्नाचे जिवंत, मूर्तिमंत द्योतक आहे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे प्रौढ, प्रताप, पुरंदर स्वरूप आहे. असा पराक्रमी, शूर आणि चतुरस्त्र भूप होणे नाही. प्रभु शंभूराजे, शतशः नमन तुम्हाला! काय

घ्यावं आम्ही
मावळ्यांनी
तुमच्या
धगधगत्या
आयुष्यातून?
आम्ही घ्यावा निर्भयपणा,
आम्ही सोडावी लाचारी
आणि गुलामगिरी,
विचारांची आणि कृतींची
आम्ही सोडावं.

**रोहित शर्माचं मोठं विधान** मी ऑस्ट्रेलियात खेळताना नेहमी बेसिक्सवर भर देतो

# ऑस्ट्रेलियात खेळणं कधीच सोपं नसतं

| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बहुचर्चित वनडे मालिका आज संपली आहे. ऑस्ट्रेलियाने २-१ च्या फरकाने ही वनडे मालिका आपल्या नावे केली. पण अखेरच्या वनडे सामन्यात टीम इंडियाचे स्टार खेळाडू रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी संघाला ९ विकेट्सने विजय मिळवून दिला. रोहित शर्माने या सामन्यात शतकी खेळी केली आणि सामनावीर ठरला. तर रोहित शर्माला मालिकावीराचा पुरस्कारही मिळाला. यानंतर रोहितने मोठं वक्तव्य केलं. आहे.**

## वरिष्ठ खेळाडूंनी खूप मार्गदर्शन केलं



रोहित शर्माने ऑस्ट्रेलियाविरूद्ध तिसऱ्या वनडे सामन्यात १२५ चेंडूत १३ चौकार आणि ३ षटकारांसह १२१ धावांची शानदार खेळी केली. तर संपूर्ण वनडे मालिकेत सर्वाधिक २०३ धावा केल्याने त्याला मालिकावीराचा पुरस्कारही देण्यात आला. रोहितने पहिल्या सामन्यात ८ धावा, तर एडलेडमधील दुसऱ्या सामन्यात ७४ धावांची खेळी केली होती.रोहित शर्मा सामनावीर व मालिकावीराचा पुरस्कार मिळाल्यानंतर म्हणाला, “ऑस्ट्रेलियात खेळताना नेहमीच कठीण परिस्थिती खेळण्याची तयारी ठेवावी लागते. दर्जेदार गोलंदाजांचा सामना करावा लागतो. त्यामुळे परिस्थिती समजून घेत सर्वोत्तम प्रयत्न करणं महत्वाचं असतं. बराच काळ आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळलो नव्हतो, पण चांगली तयारी केली होती. त्यामुळे मालिकेसाठी येण्यापूर्वी थोडा आत्मविश्वास होता. मालिका जिंकता आली नाही, पण अनेक सकारात्मक गोष्टी घडल्या. हा तरुण संघ आहे, त्यांना या मालिकेतून बरेच धडे मिळतील.”मी जेव्हा सुरूवातीला संघात आलो होतो, तेव्हा वरिष्ठ खेळाडूंनी आम्हाला खूप मार्गदर्शन केलं होतं. आता ती जबाबदारी आमची आहे. ऑस्ट्रेलियात खेळणं कधीच सोपं नसतं, परदेशात क्रिकेट खेळणं कठीण राहिलं आहे. त्यामुळे आमचा अनुभव तरुण खेळाडूंशी शेअर करून त्यांना स्वतःचा गेम प्लॅन तयार करायला मदत करणं गरजेचं आहे,” असं माजी कर्णधार पुढे म्हणाला.आजही मी ऑस्ट्रेलियात खेळताना नेहमी बेसिक्सवर भर देतो. हेच पुढच्या पिढीला सांगायचं आहे. मला ऑस्ट्रेलियात खेळायला नेहमीच आवडतं.

सिडनी क्रिकेट ग्राउंडवरील आठवणी खूप खास आहेत. उत्कृष्ट पिच, मैदान आणि प्रेक्षकवर्ग. मला माझं काम मनापासून आवडतं आणि पुढेही तसंच करत राहायचं आहे,” रोहित शर्माने अखेरीस म्हणाला.रोहित शर्माने ऑस्ट्रेलियाविरूद्ध तिसऱ्या

### ऑस्ट्रेलियात खेळायला आवडतं

मला ऑस्ट्रेलियात खेळायला नेहमीच आवडतं. सिडनी क्रिकेट ग्राउंडवरील आठवणी खूप खास आहेत. उत्कृष्ट पिच, मैदान आणि प्रेक्षकवर्ग. मला माझं काम मनापासून आवडतं आणि पुढेही तसंच करत राहायचं आहे,” रोहित शर्माने अखेरीस म्हणाला.भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बहुचर्चित वनडे मालिका आज संपली आहे. ऑस्ट्रेलियाने २-१ च्या फरकाने ही वनडे मालिका आपल्या नावे केली.

वनडे सामन्यात १२५ चेंडूत १३ चौकार आणि ३ षटकारांसह १२१ धावांची शानदार खेळी केली. तर संपूर्ण वनडे मालिकेत सर्वाधिक २०३ धावा केल्याने त्याला मालिकावीराचा पुरस्कारही देण्यात आला. रोहितने पहिल्या सामन्यात ८ धावा, तर एडलेडमधील दुसऱ्या सामन्यात ७४ धावांची खेळी केली होती.रोहित शर्मा सामनावीर व मालिकावीराचा पुरस्कार मिळाल्यानंतर म्हणाला, “ऑस्ट्रेलियात खेळताना नेहमीच कठीण परिस्थिती खेळण्याची तयारी ठेवावी लागते. दर्जेदार गोलंदाजांचा सामना करावा लागतो. त्यामुळे परिस्थिती समजून घेत सर्वोत्तम प्रयत्न करणं महत्वाचं असतं. बराच काळ आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळलो नव्हतो, पण चांगली तयारी केली होती. त्यामुळे मालिकेसाठी येण्यापूर्वी थोडा आत्मविश्वास होता. मालिका जिंकता आली नाही, पण अनेक सकारात्मक गोष्टी घडल्या. हा तरुण संघ आहे, त्यांना या मालिकेतून बरेच धडे मिळतील.”मी जेव्हा सुरूवातीला संघात आलो होतो, तेव्हा वरिष्ठ खेळाडूंनी आम्हाला खूप मार्गदर्शन केलं होतं. आता ती जबाबदारी आमची आहे. ऑस्ट्रेलियात खेळणं कधीच सोपं नसतं, परदेशात क्रिकेट खेळणं कठीण राहिलं आहे. त्यामुळे आमचा अनुभव तरुण खेळाडूंशी शेअर करून त्यांना स्वतःचा गेम प्लॅन तयार करायला मदत करणं गरजेचं आहे,” असं माजी कर्णधार पुढे म्हणाला.आजही मी ऑस्ट्रेलियात खेळताना नेहमी बेसिक्सवर भर देतो. हेच पुढच्या पिढीला सांगायचं आहे.

# पुन्हा खेळायला येऊ की नाही माहित नाही

## रोहित-विराटची मॅचविनिंग खेळीनंतर निवृत्ती जाहीर केली?

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सिडनीमध्ये रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या फटकेबाजीने धुमाकूळ घातला. रोहित शर्मा आणि विराट कोहली या जोडीने १६८ धावांची भागीदारी रचत भारताला तिसऱ्या वनडेत एकतर्फी विजय मिळवून दिला. रोहितने शतकी खेळी केली तर विराटने अर्धशतक केलं. रोहित-विराटने या मॅचविनिंग खेळीनंतर त्यांच्या निवृत्तीवर मोठं वक्तव्य केलं.**



ॲडलेडनंतर, तिसऱ्या एकदिवसीय सामन्यातही हिटमॅनने बॅटने उत्कृष्ट कामगिरी केली. रोहितने शानदार फलंदाजी करत १२५ चेंडूत नाबाद १२१ धावा केल्या. दोन वेळा शून्यावर बाद झाल्यानंतर विराटनेही उत्कृष्ट फॉर्ममध्ये येऊन ८१ चेंडूत ७४ धावांची खेळी करत रोहितला चांगली साथ दिली. कोहली आणि रोहितने दुसऱ्या विकेटसाठी १६८ धावांची अखंड भागीदारी केली आणि संघाला विजयाकडे नेलं. भारताच्या विजयानंतर, रोहित आणि कोहलीने एकत्रितपणे माजी क्रिकेटपटू रवी शास्त्री व एडम गिलक्रिस्ट यांच्याशी चर्चा केली. रोहित शर्मा आधी म्हणाला, “मला नेहमीच ऑस्ट्रेलियात येऊन खेळायला आवडतं आणि सिडनीच्या या मैदानावर क्रिकेट खेळण्याचा अनुभव नेहमीच खास राहिला आहे. २००८ मधल्या माझ्या पहिल्या ऑस्ट्रेलिया दौऱ्याच्या आठवणी पुन्हा जाग्या झाल्या, तो दौरा खरंच कमाल होता. आता आम्ही पुन्हा इथे खेळायला येऊ की नाही माहित नाही, पण प्रत्येक क्षणाचा मी मनापासून आनंद घेतलाय.”गेल्या अनेक वर्षांतील सन्मान आणि यशापेक्षा आम्हाला क्रिकेट खेळण्याचा आनंद जास्त महत्त्वाचा वाटतोत्यामुळे ऑस्ट्रेलियाचे खूप खूप आभार,” असं रोहित म्हणाला.

### सर्वोत्तम खेळी आपोआप बाहेर येते

विराट कोहली पुढे म्हणाला, “आपण कितीही वर्षं आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळलो तरी हा खेळ नेहमी काहीतरी नवं शिकवतो (पहिल्या दोन सामन्यात शून्यावर बाद होण्याबद्दल बोलताना विराटने सांगितलं). काही दिवसांत मी ३७ वर्षांचा होणार आहे, पण धावांचा पाठलाग करताना माझ्यातील सर्वोत्तम खेळी आपोआप बाहेर येते.

स्मार्ट PCMC
# महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
।सोमवार।
। दि. 27 ऑक्टोबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### पंतप्रधान मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमातून

# राष्ट्रविकासाचा संदेश! - दिनेश यादव

## पंतप्रधानांच्या विचारांतून राष्ट्रप्रेम, जबाबदारी आणि अभिमानाची भावना अधिक दृढ!




। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**स्वच्छता, पर्यावरण, जैवविविधता, भाषा, संस्कृती, स्वदेशी उद्योग आणि आत्मनिर्भर भारत या विषयांवर सखोल मार्गदर्शन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी "मन की बात" कार्यक्रमातून करतानाच राष्ट्रविकासाचा संदेश दिला असल्याचे भाजपा युवा मोर्चा पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष दिनेश यादव म्हणाले.**

प्रत्येक भारतीयाशी थेट संवाद साधणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' या संवादात्मक कार्यक्रमाच्या १२७व्या भागातून देशवासियांना संबोधित केले. हा प्रेरणादायी कार्यक्रम शहरातील सहकार्यांसोबत पाहून शहरासाठी अधिक चांगल्या प्रकारे काम करण्याची उर्मी मिळाली असल्याचे दिनेश यादव यांनी सांगितले. या कार्यक्रमावेळी प्रमुख उपस्थिती संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, माजी नगरसेवक विकास डोळस, वैशाली ताई खाड्ये, अजय पाताडे, संजय पटनी, संकेत चोंधे आणि अजित कुलथे यांची होती.

दिनेश यादव पुढे म्हणाले आपल्या संवादातून पंतप्रधान मोदी यांनी समाजातील सकारात्मक बदल, जनसहभाग आणि राष्ट्रविकासासाठी देशभर चालू असलेल्या विविध उपक्रमांवर प्रकाश टाकला.या संवादात पंतप्रधानांनी स्वच्छता, पर्यावरण, जैवविविधता, भाषा, संस्कृती, स्वदेशी उद्योग आणि आत्मनिर्भर भारत या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमाचा विशेष उल्लेख करत नागरिकांना पर्यावरण संवर्धनासाठी सक्रीय भूमिका बजावण्याचे आवाहन केले. तसेच स्वदेशी उत्पादनांना मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि आत्मनिर्भरतेच्या दिशेने देश करीत असलेल्या प्रयत्नांचे कौतुकही केले आहे यातून आम्हाला युवकांना नव प्रेरणा मिळत आहे.या प्रेरणादायी संवादातून पंतप्रधान मोदी यांनी प्रत्येक भारतीयाच्या मनात नवचैतन्य निर्माण केले असून त्यांच्या विचारांतून राष्ट्रप्रेम, जबाबदारी आणि अभिमानाची भावना अधिक दृढ झाली आहे. असेही यादव म्हणाले.

**वंदे मातरम' च्या १५० व्या वर्षानिमित्त कार्यक्रमानिमित्त उत्साही सहभाग घेणार**

पंतप्रधानांनी ओडिशातील कोरापुट कॉफी या स्थानिक उत्पादनाच्या जागतिक यशाचा उल्लेख करत भारतातील स्थानिक उद्योगांनी जागतिक स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी ७ नोव्हेंबर रोजी 'वंदे मातरम' गीताच्या १५० व्या वर्षानिमित्त देशभर आयोजित कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी उत्साहाने सहभागी होण्याचे आवाहन केले. यामध्ये पिंपरी चिंचवड शहर भाजपा युवा मोर्चाच्या माध्यमातून घेऊन सहभागी होईल असे यादव म्हणाले.

# नशामुक्त भारत ही काळाची गरज! - ॲड. सतिश गोरडे

## विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलतर्फे अभ्यास वर्ग

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**'जागतिक स्तरावर वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था आणि विश्वगुरू म्हणून भारताला मान्यता मिळत असताना नशामुक्त भारत ही ओळख प्रस्थापित होणे ही काळाची गरज आहे!' असे विचार ज्येष्ठ विधिज्ञ आणि विश्व हिंदू परिषद प्रांत सह मंत्री ॲड. सतिश गोरडे यांनी व्यक्त केले.**



इंटेलिजन्स कॅडेट इंटरनॅशनल स्कूल, पेठ क्रमांक ३, इंद्रायणीनगर, भोसरी येथे विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल आयोजित दोन दिवसीय अभ्यास वर्गाच्या समारोप प्रसंगी ॲड. सतिश गोरडे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर बजरंग दल प्रांत सह संयोजक संदेश भेगडे, प्रांत सुरक्षा प्रमुख सुशांत गाडे, विभाग संयोजक नाना सांवत, जिल्हा संयोजक अरविंद लंघे, जिल्हा सहसंयोजक पन्नालाल जाधव आदी मान्यवरांची उपस्थिती होती. ॲड. सतिश गोरडे पुढे म्हणाले की, 'जागतिक स्तरावर भारत अतिशय वेगाने आर्थिक प्रगतीसह सर्वच क्षेत्रांत मानाचे अन् आदराचे स्थान प्राप्त करीत असताना शत्रुराष्टे अंमली आणि मादक पदार्थांच्या माध्यमातून आपल्या देशातील तरुणाईला निष्प्रभ करणाचे षडयंत्र सातत्याने राबवत आहे. मादक आणि अंमली पदार्थाचे व्यसन हे फक्त उच्चभ्रू सोसायटीत आहे, असा आपला सर्वांचा आतापर्यंत गैरसमज होता. परंतु उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन तरुणाई ही मादक आणि अंमली पदार्थांच्या विळख्यात सापडलेली आहे, असे अनेक उदाहरणांवरून स्पष्ट झाले आहे.

### दोन दिवसीय अभ्यास वर्गात

जिल्हा मंत्री धनंजय गावडे, सह मंत्री किरण शिंदे, सह मंत्री संभाजी बालघरे, भास्कर भगत, चैतन्य सुडे यांनी देखील मार्गदर्शन केले. पिंपरी-चिंचवड जिल्ह्यातील ११ प्रखंडातील बजरंगदलाचे पदाधिकारी या अभ्यासवर्गात सहभागी झाले होते. वर्गाचे संयोजन प्रवीण शेटे,अभिजीत चव्हाण, ऋषी चावरे, गौरव शिंदे यांनी केले.




Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS
THROUGH LEARNING
Admission
Open
FOR 2026 – 27
Nursery – Std X
• CBSE Curriculum
• Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
• Digital Classrooms with AV Facilities
• Skill Development Programs including:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
• Focus on Holistic Development
Enroll Now!
Sunday Open: From 10 AM to 1 PM
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune

# Diwali Gift for Chinchwad Constituency through Efforts of MLA Shankar Jagtap

## ₹12 crore sanctioned by the State Government for various development works

Mahaenews
Pimpri- Chinchwad :
Special Correspondent

Through the special efforts of Chinchwad constituency MLA Shankar Jagtap, the State Government has sanctioned around ₹12 crore under various ongoing schemes. This fund will be utilized for projects related to public amenities and civic infrastructure within the constituency. On the occasion of the Diwali festival, this allocation has effectively become a "Diwali gift" for the Chinchwad constituency. The fund especially benefits the rapidly developing areas of Wakad, Punawale, Mamurdi, and Kiwale, giving a boost to their development.

The Mahayuti Government of Maharashtra is focused on achieving developmental goals and fulfilling the aspirations of the people. BJP MLA Shankar Jagtap has been consistently working to secure funds from the government for various projects. On the eve of Diwali, through his efforts, the State Government has sanctioned funds for several works in the Chinchwad constituency.

Under the Special Provision Scheme for the development of basic civic amenities in municipal areas, ₹5 crore has been sanctioned for four major projects. These include:

Construction of a well-equipped multi-purpose building at Ravet

Setting up a sports complex on municipal land in Mamurdi

Establishment of a sports complex at Wakad-Venunagar

Expansion of the Bharat Ratna Park at Kiwale to national standards



> "With rapid urbanization, the demand for basic civic amenities has increased tremendously. The ₹12 crore sanctioned by the government will play a vital role in the overall progress of a developed and smart Chinchwad constituency. Especially in the fast-growing areas of Wakad, Punawale, Ravet, Mamurdi, and Kiwale, citizens will greatly benefit from these works. The new facilities being created for sportspersons, senior citizens, women, and youth represent a strong step toward building a healthy, strong, and developed Chinchwad. Our goal is to ensure that government funds are used effectively so that the benefits of development reach every citizen."
>
> **—Shankar Jagtap,**
> MLA, Chinchwad Assembly Constituency

In addition, ₹5 crore has been sanctioned by the government for providing specific urban services and facilities in the jurisdiction of local self-government bodies. This includes:

Construction of a social hall for senior citizens, a sports complex, a swimming pool, and a tennis court in Wakad

Construction of a community hall, library, and recreation center in Punawale

Beautification works in the Sangvi area

Under the Bharat Ratna Dr. Babasaheb Ambedkar Social Development Scheme, ₹2 crore has been sanctioned for 14 works, out of which ₹20 lakh has already been made available. These include:

Installation of water and drainage lines in Kiwale MB Camp slum

Construction of a library, concreting of roads, and community hall in the same area

Beautification of the traffic island and construction of a new public toilet in Nagasen Nagar slum

Building of a compound wall and study center at the Buddha Vihar in Laxminagar, Pimples Gurav

Various improvement works around the Vetalnagar Buddha Vihar slum area

Laying of drainage lines in Dalitwasti locality at Thergaon Jagatapnagar

Installation of drainage lines in the Rajiv Gandhi Nagar slum, Pimples Gurav